| | |
|---|---|
| MHNG150016932021 | दाखल तारीख : २८/९/२०२१<br>नोंदणी तारीख : २८/०९/२०२१<br>निकाल तारीख : १६/०५/२०२६<br>**कालावधी : ०४ वर्षे, ०७ महिने, १८ दिवस** |

नमुना क्र . XXXII
भाग 'अ'
(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ )
[फौजदारी नियमावली प्रकरण VI परिच्छेद 44(i)]

**हिंगणा येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी श्री व्ही. एच. खेडकर)**

**(निकाल तारीख : १६ मे, २०२६)**

**संक्षीप्त फौजदारी खटला क्र. १०३३/२०२१** **निशाणी क्र. २१**

प्रथम खबरी अहवालाचे विवरण –
गु.र.क्र. – ३२७/२०२१, दिनांक ०९/०७/२०२१.
पोलीस ठाणे – हिंगणा, नागपूर

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस ठाणे हिंगणा, नागपूर |
| सरकारतर्फे विधीज्ञ | श्री एस. पी. देशमुख |
| **आरोपी** | **१) आशिष पांडुरंग भगत,** वय – ४१ वर्षे,<br>राहणारः– प्लॉट नं.३६, महाजनवाडी, हिंगणा, नागपुर<br>**२) धर्मपाल गुलाबराव मुन,** वय – ५६ वर्षे,<br>राहणारः– जयपुरकर लॉनच्या मागे, महाजनवाडी,<br>हिंगणा, तह–हिंगणा, जिल्हा–नागपुर |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | श्री. धिरज लामसोंगे |

**भाग 'ब'**

[फौजदारी दिनयमावली प्रकरण VI परिच्छेद 44(ii)]

| | |
|---|---|
| घटनेची तारीख | ०९/०७/२०२१ |
| प्रथम खबर अहवालाची तारीख | ०९/०७/२०२१ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | ११/०९/२०२१ |
| दोषारोप / आरोपाचा आशय निश्चीत केल्याची तारीख | १४/०३/२०२४ |
| पुरावा सुरू केल्याची तारीख | १२/०३/२०२६ |
| निकाल राखुन ठेवल्याची तारीख | १६/०५/२०२६ |
| निकाल तारीख | १६/०५/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | लागू नाही |

**आरोपीचे विवरण**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप निश्चीत केल्याचे कलम | शिक्षा किंवा निदोर्ष सुटका | शिक्षा | संपरीक्षेदरम्यान आरोपी कोठडीत असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आ–१ | **आशिष पांडुरंग भगत** | ०९–०७–२०२१ | सुचनापत्रावर सोडण्यात आले | भादवि कलम १८८, २७०, तसेच आपत्ती व्यवस्थापन कायद्याचे कलम ५१–ब व साथीरोग अधिनियमचे कलम ३ अन्वये | निर्दोष सुटका | लागू नाही | लागू नाही |
| आ-२ | **धर्मपाल गुलाबराव मुन** | ०९–०७–२०२१ | सुचनापत्रावर सोडण्यात आले | | | | |

## न्यायनिर्णय

०१} प्रस्तुत खटल्यामध्ये आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम १८८, २७०, तसेच आपत्ती व्यवस्थापन कायद्याचे कलम ५१–ब व साथीरोग अधिकनयमचे कलम ३ अन्वये शिक्षापात्र असलेल्या गुन्ह्याकरीताच्या आरोपाचा आशय निश्चीत करण्यात आलेला आहे.

**अभियोग पक्षाचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे :–**

०२} फिर्यादी प्रकाष अहिरे हे पोलीस उपनिरीक्षक असुन त्यांनी सरकारतर्फे दिनांक ०९/०७/२०२१ रोजी फिर्याद दिली की, दिनांक ०९/०७/२०२१ रोजी ते १६ः३० वाजता पासुन स्टाफ सोबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक साहेबांच्या आदेशान्वये संचारबंदी व जमावबंदी असल्याने पेट्रो मोबाईल ने पेट्रोलींग करीत असतांना आरोपी हा अमरावती बायपास रोडवरील सोनु दा ढाबा चालु ठेवुन ग्राहकांना खाण्यापिण्याचे पदार्थ तेथेच बसुन विक्री करतांना मिळुन आल्याने सदर ढाब्याचे चालकास त्याचे नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव धर्मपाल गुलाबराव मुन असे सांगीतले. त्याच्या समारच ढाब्यावर एक ईसम टेबलवर बसुन स्टारलींग रिजर्व बी–७ दारु पित असतांना मिळुन आला. त्यानंतर सदर ढाब्याचे मालक तेवढयात तेथे हजर झाले. त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव ओशिष पांडुरंगजी भगत असे सांगीतले. अशा प्रकारे आरेपीने कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव झपाटयाने वाढत असल्याने साथीचा रोग पसरु नये म्हणुन महाराष्ट्र शासनाने संपुर्ण जमावबंदी व संचारबंदी सुरु केली आहे. त्याकरीता शासनाचे आदेश क्र. Adm/Home/Sec 14 (2)/DMA/WS-969/2021

dated 25/06/2021 अन्वये संचारबंदीचा आदेश लागु असतांना आरोपींनी त्यांचा सोनु दा ढाबा हा चालु ठेवुन ग्राहकांना बसवुन खाण्यापिण्याचे पदार्थ तसेच दारु पिण्याकरीता जागा उपलब्ध करुन दिली व त्याद्वारे सदर आदेशाचे उल्लंघन करुन साथीरोगाचा पसार होण्यास कारणीभुत झाला. अशा प्रकारची तक्रार फिर्यादीने आरोपींविरोधात हिंगणा पोलीस स्टेशनला दाखल केली.

०३} फिर्यादीने दिलेल्या फिर्यादनुसार ३२७/२०२१ ची पोलिस ठाणे हिंगणा, तह–हिंगणा, जिल्हा–नागपूर येथे नोंद झाली. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री प्रकाष अहिरे यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. साक्षीदारांचे जाब–जबाब नोंदवून घेतले आणि तपासाअंती सबळ पुरावा उपलब्ध झाल्यामुळे त्यांनी आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

०४} माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरूध्द नि. क्र. १३ वर भारतीय दंड विधान कलम १८८, २७०, तसेच आपत्ती व्यवस्थापन कायद्याचे कलम ५१–ब व साथीरोग अधिनियमचे कलम ३ अन्वये गुन्हयाकरीताच्या आरोपाचा आशय निश्चित करुन आरोपीस त्याच्या भाषेमध्ये वाचून दाखविला. त्यास आरोपीने गुन्हा नाकबुल असल्याचे सांगुन खटला पुढे चालविण्यास म्हटले. प्रस्तुतचे प्रकरण हे साक्षीदारांचा विस्तृत पुरावा नोंदवुन समंस संपरिक्षेप्रमाणे चालविले. आरोपीविरुद्ध आरोप सिद्ध होण्याईतपक पुरावा न आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ३१३ अन्वयेचा जवाब नोंदविण्यात आला नाही.

०५} सरकार पक्षातर्फे सरकारी वकील श्री एस.पी.देशमुख आणि आरोपीतर्फे वकील श्री. धिरज लामसोंगे यांचा युक्तिवाद ऐकला.

०६} प्रकरणाच्या निकालाकरीता उपस्थित झालेले मुद्दे व त्यावरील कारणमीमांसेसह काढलेले निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत.

| <u>अ.क्र.</u> | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| ०१. | अभियोग पक्ष हे सिद्ध करते काय की, दिनांक ०९–०७–२०२१ रोजी मौजा सोनुदा ढाबा, अमरावती बायपास रोड, हिंगणा, तह–हिंगणा, जिल्हा–नागपुर येथे आरोपींच्या संगनमताने त्यांनी लोकसेवकाने योग्यरित्या जाहिर केलेल्या आदेशाची अवज्ञा करुन त्यांच्या आदेशाचे उल्लंघन केले व त्याद्वारे भारतीय दंड विधान कलम १८८ अन्वये आरोपींनी गुन्हा केला ? | **..नाही.** |
| ०२. | अभियोग पक्ष हे सिद्ध करते काय की, वरील दिनांक, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने कोरोना महामारीच्या काळामध्ये ढाबा चालु ठेवल्यास सदर महामारीचा प्रार्दुभाव वाढु शकतो याची माहिती असतांना सुद्धा जाणीवपुर्वक (दुर्भावनेने) आपल्या ढाब्यामध्ये ग्राहकांना खाण्यापिण्याच्या पदार्थाची विक्री करतांना मिळुन आले व त्याद्वारे भारतीय दंड विधान कलम २७० अन्वये आरोपींनी गुन्हा केला ? | **..नाही.** |
| ०३. | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, वरील दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपींनी संगनमताने जिल्हाधिकारी यांच्या आपात्कालीन परीस्थीतीच्या काळात जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघन करुन आपत्ती व्यवस्थापन कायद्या कलम ५१–ब अन्वये आरोपींनी गूऩ्हा केला? | **..नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ०४. | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, वरील दिनांक, वेळ व ठिकाणी आरोपींनी संगनमताने जिल्हाधिकारी यांच्या कोरोना सारख्या साथीच्या रोगाच्या नियंत्रणासाठी जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघन करुन साथीचे रोग अधिनियम कलम ३ अन्वये आरोपींनी गून्हा केला? | **..नाही.** |
| ०५. | वरील दिनांक वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने त्यांच्या ढाब्यामध्ये ग्राहकांना दारु पिण्यास जागा उपलब्ध करुन दिली व त्याद्वारे आरोपींनी महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ अन्वये आरोपींनी गुन्हा केला? | **..नाही.** |
| ०६. | अंतिम आदेश काय ? | **आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली.** |

## <u>कारणमीमांसा</u>

**<u>मुद्दे क्र.१ ते ४ करीता :-</u>**

०७} मुद्दे क्र १ ते ४ हे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे त्याबाबतचे कारणे एकत्रीतरित्या पुढीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

०८} आरोपीवरील भारतीय दंड विधान कलम १८८, २७०, तसेच आपत्ती व्यवस्थापन कायद्याचे कलम ५१-ब व साथीरोग अधिकनयमचे कलम ३ अन्वयेचे आरोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षास सिद्ध करावयाचे होते की, जिल्हाधिकारी यांचा आदेश क्र. Adm/Home/Sec 14 (2)/DMA/WS-969/2021 dated 25/06/2021 अन्वये संचारबंदीचा आदेश लागु असतांना आरोपींनी त्यांच्या सोनु दा ढाबा हा चालु

ठेवुन ग्राहकांना बसवुन खाण्यापिण्याचे पदार्थ तसेच दारु पिण्याकरीता जागा उपलब्ध करुन दिली व त्याद्वारे सदर आदेशाचे उल्लंघन करुन साथीरोगाचा पसार होण्यास कारणीभुत झाला.

०९} सर्वप्रथम प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपींविरुद्ध तथाकथीत कलमान्वये दखल घेण्याकरीता आवश्यक ते घटक पुर्ण होतात किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. साथीरोग अधिनियमचे कलम ३ नुसार जो गुन्हा होतो त्याला भारतीय दंड विधानचे कलम १८८ अन्वये शिक्षा दयावी, अशी तरतुद आहे. त्यामुळे साथीरोग अधिनियमचे कलम ३ किंवा भारतीय दंड विधानचे कलम १८८ अन्वयेच्या गुन्हयाची दखल घेण्याकरीता फौजदारी प्रक्रीया संहिताचे कलम १९५(१) नुसार ज्या अधिका–याच्या आदेशाचा भंग झाला, त्या अधिका–याने किंवा त्याच्या वरिष्ठ अधिका–याने साथीरोग अधिनियमचे कलम ३ किंवा भारतीय दंड विधानचे कलम १८८ अन्वये पुढील कार्यवाहीकामी तक्रार देणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणातील फिर्याद नुसार आरोपींनी जिल्हाधिकारी यांचा आदेश क्र. Adm/Home/Sec 14 (2)/DMA/WS–969/2021 dated 25/06/2021 या आदेशाचा भंग केला. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणातील फिर्याद ही जिल्हाधिकारी किंवा त्यांच्या वरिष्ठांनी करणे आवश्यक होते. परंतु प्रस्तुत प्रकरणातील फिर्याद ही जिल्हाधिकारी किंवा त्यांच्या वरिष्ठांनी दाखल केली नाही. याउलट, प्रस्तुत प्रकरणातील फिर्याद ही पोलीस उपनिरीक्षक प्रकाष अहिरे यांनी दाखल केली आहे. त्यामुळे त्यांच्या तक्रारीनुसार साथीरोग अधिनियमचे कलम ३ व भारतीय दंड विधानचे कलम १८८ अन्वयेच्या गुन्हयाकरीता फौजदारी प्रक्रीया संहिताचे

कलम १९५(१) नुसार दखल घेणे कायदेशीर नाही.

१०} तसेच आपत्ती व्यवस्थापन कायद्याचे कलम ५१–ब नुसारच्या गून्हयाची दखल घेण्याकामी सदर कायद्याचे कलम ६० चा उल्लेख करणे आवश्यक आहे. सदर कायद्याचे कलम ६० नुसार खालील व्यक्तींनी केलेल्या तक्रारीशिवाय कोणतेही न्यायालय घेणार नाही-

*(अ) राष्ट्रीय प्राधिकरण, राज्य प्राधिकरण, केंद्र सरकार, राज्य सरकार, जिल्हा प्राधिकरण किंवा त्या प्राधिकरणाने किंवा सरकारने या संदर्भात प्राधिकृत केलेले इतर कोणतेही प्राधिकरण किंवा अधिकारी, यथास्थिती; किंवा*

*(ब) कोणतीही व्यक्ती जिने विहित पद्धतीने, कथित गुन्ह्याची आणि राष्ट्रीय प्राधिकरण, राज्य प्राधिकरण, केंद्र सरकार, राज्य सरकार, जिल्हा प्राधिकरण किंवा उपरोक्तप्रमाणे अधिकृत केलेले इतर कोणतेही प्राधिकरण किंवा अधिकारी यांच्याकडे तक्रार करण्याच्या तिच्या इराद्याची, किमान तीस दिवसांची नोटीस दिली आहे.*

११} प्रस्तृत प्रकरणातील तक्रार उपरोक्त व्यक्तींपैकी कोणा एकाने केलेली दिसुन येत नाही. त्यामुळे सदर कायद्याचे कलम ५१–ब नुसारच्या गुन्हयाची दखल घेणे सुद्धा सदर कायद्याची दखल घेणे सुद्धा कायदोचीत नाही.

१२} याव्यतिरिक्त, अभियोगपक्षाच्या आरोपानुसार आरोपींनी यांनी जिल्हाधिकारी यांचा आदेश क्र. Adm/Home/Sec 14

(2)/DMA/WS-969/2021 dated 25/06/2021 यांच्या या आदेशातील निर्देशाचा भंग केला. तपासी अधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांचा आदेश क्र. Adm/Home/Sec 14 (2)/DMA/WS-969/2021 dated 25/06/2021 ची झेरॉक्सप्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यानुसार सदर आदेश हा **दिनांक २५/०६/२०२१ चे सकाळी ७:०० ते दिनांक ०५/०७/२०२१ चे सकाळी ७:००** पर्यंत लागु असल्याचे सदर आदेशाच्या शेवटच्या परिच्छेदामध्ये नमुद आहे. प्रस्तृत प्रकरणातील तथाकथीट घटना ही **दिनांक ०९/०७/२०२१** रोजी घडली आहे.त्यामुळे तथाकथीत घटना ही सदर आदेशाची विहीत मुदत संपल्यानंतर घडल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे सुद्धा आरोपींनी तथाकथीत आदेशाचा भंग केला, असे सिद्ध होतांना दिसुन येत नाही.

१३} याव्यतिरिक्त, सदर आरोप सिद्ध करण्याकरीता अभियोगपक्षाने पंच साक्षीदार क्रृष्णदास (अ.सा.क्र.१) याच्या पुराव्यावर भिस्त ठेवली. परंतु त्याने अभियोगपक्षास सहाय्य केले नाही. तसेच पुरेसी संधी देऊन सुद्धा अभियोगपक्ष इतर साक्षीदारांचा पुरावा नोंदवु शकले नाही. त्यामुळे आरोपीवरील आरोप सिद्ध करण्याकरीता महत्त्वाच्या साक्षीदारांचा पुरावा अभिलेखावर येवु शकला नाही. तसेच तथाकथीत घटना ही सार्वजनीक ठिकाणी घडुन सुद्धा पंचांव्यतिरिक्त इतर दुसरे प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा जवाब तपासी अधिकारी यांनी नोंदविलेला दिसुन येत नाही. त्यामुळे आरोपीने संगनमताने कोरोना महामारीच्या काळामध्ये ढाबा चालु ठेवुन महामारीचा प्रार्दुभाव वाढु शकेल असे कृत्य केले, हे सुद्धा संशयापलीकडे प्रस्तृत

प्रकरणामध्ये सिद्ध होतांना दिसुन येत नाही.

१४} उपरोक्त चर्चेवरुन असे स्पष्ट होत आहे की, प्रस्तृत प्रकरणातील फिर्याद ही आवश्यक त्या अधिका–याने न दिल्यामुळे भारतीय दंड विधान कलम १८८,तसेच साथीरोग अधिकनयमचे कलम ३ व आपत्ती व्यवस्थापन कायद्याचे कलम ५१–ब अन्वयेचे गुन्हयाकरीता सुद्धा दखल घेणे कायदोचीत नाही. तसेच आरोपींवरील तथाकथीत आरोप सिद्ध करण्याकरीता पुरेसा पुरावा अभिलेखावर आलेला दिसुन येत नाही. त्यामुळे आरोपींना तथाकथीत आरोपांकरीता दोषी धरणे शकय नाही म्हणुन मूद्दा क्र. १ ते ४ ला नकारार्थी उत्तर देण्यात येत आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ करिता :–</u>**

१५} प्रस्तृत प्रकरणामध्ये महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६८ नुसारचे आरोप सिद्ध करण्याकरीता अभियोगपक्षास सिद्ध करावयाचे होते की, आरोपींनी संगनमताने बेकायदेशीररित्या लोकांना दारु पिण्याकरीता त्यांच्या सोनु दा ढाबा येथे जागा उपलब्ध करुन दिली. त्याकरीता अभियोगपक्षाने पंच साक्षीदार क्रृष्णदास (अ.सा.क्र.१) यांच्या तोंडी पुराव्यावर भिस्त ठेवली. परंतु सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य केले नाही. त्यामुळे सदर स्वतंत्र पंचाच्या पुराव्यातुन जप्ती सिद्ध झाली नाही. तसेच तथाकथीत जप्त दारुची बॉटल, प्लास्टीक टेबल व खुर्च्या हया प्रस्तृत प्रकरणामध्ये संपरिक्षेदरम्यान पुरेसी संधी देऊन सुद्धा हजर करण्यात आले नाही. तसेच घटनास्थळावर दारु पितांना मिळुन आलेले तथाकथीत ईसमांबाबत कुठलाही तपास केलेला दिसुन येत नाही किंवा त्यांचा जवाब प्रस्तृत प्रकरणामध्ये नोंदविलेला दिसुन येत नाही. तसेच पंचाव्यतिरिक्त प्रस्तृत प्रकरणामध्ये घटना ही सार्वजनीक ठिकाणी

घडुन सुद्धा स्वतंत्र साक्षीदारांचे जवाब नोंदविलेले दिसुन येत नाही. अशा परिस्थीतीमध्ये आरोपीच्या उपरोक्त ढाब्यामध्ये लोकांना दारु पिण्यासाठी जागा उपलब्ध करुन दिली, असे संशयापलीकडे सिद्ध होतांना दिसुन येत नाही.

१६} यााव्यतिरीक्त, प्रस्तुत प्रकरणामध्ये पुरेशा कालावधी जावुन सुध्दा घटनास्थळावर मिळून आलेले तथाकथीत रसायन हे दारुच होती हे दाखविण्यासाठी रासायनिक विश्लेषणाचा अहवाल अभिलेखावर आलेला नाही. तसेच सदर तथाकथीत रसायन रासायनिक विश्लेषणाकरिता घेऊन जाणाऱ्या इसमाचा सुध्दा तपासी अधिकारी यांनी जबाब नोंदविल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे तथाकथीत जप्त रसायन हे दारुच होते किंवा तेच रसायन विश्लेषणाकरिता नेले हे दाखविणारा विश्वसनीय पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामूळे घटनास्थळावर जप्त झालेले रसायन हे दारु होते हे संशयापलीकउे सिद्ध होत नाही. अशा परिस्थीतीमध्ये आरोपीवरील त्याने लोकांना मद्यप्राशन करण्यासाठी जागा उपलब्ध करुन दिली असे गृहीत धरणे शक्य नाही. त्यामुळे आरोपीवरील तथाकथित आरोप संशयापलीकडे सिध्द होताना दिसून येत नाही. सबब, मुद्दा क्र. ५ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ६ करिता :–</u>**

१७} मुद्दे क्र. १ ते ५ चे निष्कर्षास अनुसरुन आरोपी हा निर्दोष सुटण्यास पात्र आहे. परिणामी मुद्दा क्र. ६ चे उत्तरार्थ खालील आदेश पारीत करणेत येतो.

## आदेश

०१. आरोपीला भारतीय दंड विधान कलम १८८, २७०, तसेच आपत्ती व्यवस्थापन कायद्याचे कलम ५१–ब व साथीरोग

अधिकनयमचे कलम ३ अन्वयेच्या दंडनीय अपराधाच्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

०२. आरोपीचा जामीनकतबा व जात मुचलका रद्द करण्यात येतो.

०३. फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ प्रमाणे आरोपीने रुपये १५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व जामीनदाराचे बंधपत्र द्यावे.

०४. प्रस्तुत निकालाची प्रत फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३६५ अन्वये मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांना द्यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात टंकलिखीत करुन घोषित)

VISHAL HARIBHAU KHEDKAR
Digitally signed by VISHAL HARIBHAU KHEDKAR
Date: 2026.05.16 18:00:07 +0530

ठिकाण – हिंगणा.
दिनांक – १६/०५/२०२६.

(व्ही. एच. खेडकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग हिंगणा,
जिल्हा नागपूर.

**जोडपत्र**

**भाग 'ब'**

**[फौजदारी नियमावली प्रकरण VI परिच्छेद 44(iii)**

अभिभयोग पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयाचे साक्षीदार यांची यादी

**अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| अ.सा.क्र. १ | क्रृष्णा दास साबारे दास | पंच साक्षीदार |

**आरोपीच्या साक्षीदारांची यादी**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## न्यायालयीन साक्षीदारांची यादी

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## अभियोगपक्षाने दाखल केलेल्या दस्तांच्या निशाणी क्रमांकाची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## आरोपीस मान्य असलेले दस्ताऐवज

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## आरोपीने दाखल केलेल्या दस्तांच्या निशाणी क्रमांकाची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## न्यायालयाने स्वतःहुन दिलेल्या दस्तांच्या निशाणी क्रमांकाची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

## आर्टिकल / चीजवस्तु

| अ.क्र. | आर्टिकल क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

VISHAL HARIBHAU KHEDKAR
Digitally signed by VISHAL HARIBHAU KHEDKAR
Date: 2026.05.16 18:00:16 +0530

ठिकाण – हिंगणा. (व्ही. एच. खेडकर)
दिनांक – १६/०५/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग हिंगणा,
जिल्हा– नागपुर.